<u>**अतारांकित प्रश्नोत्तरांची सातवी यादी**</u>

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्य दहशतवाद विरोधी पथकात (ATS) अधिकाऱ्याची बदली होऊनही सदर अधिकारी मुंबई पोलीस दलात कार्यरत असल्याबाबत

**(१) ३८६९ (०९-०९-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य दहशतवाद विरोधी पथकात (ATS) अधिकाऱ्याची बदली होऊनही सदर अधिकारी मुंबई पोलीस दलात कार्यरत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त १२ अधिकाऱ्यांना तत्कालीन आयुक्त यांनी गेल्या वर्षी कारणे दाखवा नोटीसा बजावल्या असूनही उक्त अधिकाऱ्यांना अद्‌यापि कार्यमुक्त न करण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१०-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी १६ पोलीस अधिकारी यांच्या राज्य दहशतवाद विरोधी पथक, मुंबई येथे बदल्या दर्शविल्या होत्या. सदर १६ पोलीस अधिकाऱ्यांपैकी ६ पोलीस अधिकारी यांना कार्यमुक्त करण्यात आले.

बदली दर्शविलेल्या उर्वरीत पोलीस अधिकारी यांना विधानसभा निवडणूक-२०१९ बंदोबस्त, धार्मिक उत्सवाच्यावेळी कायदा व सुव्यवस्था राखण्याकरीता मनुष्यबळाची कमतरता असल्याने कार्यमुक्त करण्यात आले नव्हते व तदनंतर यापैकी ९ पोलीस अधिकाऱ्यांची पदोन्नतीने अन्यत्र बदली झाल्यामुळे बदलीच्या पदावर रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुरुड (जि.रायगड) तालुक्यात मच्छिमारांसाठी अद्ययावत विकसित बंदर उभारण्याबाबत

**(२) ८४३३ (१४-०६-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड (जि.रायगड) तालुक्यात मच्छिमारांसाठी आगरदांडा बंदर, खोरा बंदर, राजपूरी बंदर, मुरुड बंदर आणि नांदगाव ही बंदरे असून तेथे छोट्या जेट्टी असल्यामुळे मच्छिमारांकडून या जेट्टींचा वापर केला जात नसून मुरुड किनाऱ्यावर अद्ययावत जेट्टी नसल्याने मच्छिमारांना वाळूत बोटी लावाव्या लागत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुरुड किनाऱ्यावर बंधारा न झाल्याने मच्छिमार बोटी ओहोटीला किनाऱ्यावर येत नाहीत, त्यामुळे मच्छिमारांना मच्छिची व आवश्यक साहित्यांची वाहतूक करणे गैरसोयीचे व त्रासदायक होत आहे, तसेच मुरुडमध्ये मासळी साठवण्यासाठी शीतगृह व बर्फ फॅक्टरी नसल्यामुळे मच्छिमारांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुरुड तालुक्यात अद्ययावत विकसित बंदराची उभारणी करुन मच्छिमारांसाठी आवश्यक त्या उपाययोजना उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (२४-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

खोरा बंदर, आगरदांडा बंदर ह्या दोन्ही प्रवासी जेट्टी असल्याने सदर जेट्टीवर मासळी उतरविली जात नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) मुरुड तालुक्यातील एकदरा येथे मच्छिमारांकरीता मुलभूत सोयी सुविधा पुरविणे हे काम नाबार्ड टप्पा क्र.२० अंतर्गत पूर्ण करण्यात आले आहे. नाबार्ड टप्पा क्र.२२ अंतर्गत मंजूर बोर्ली-मांडला हे काम प्रगतीपथावर आहे. नाबार्ड क्र.२३ अंतर्गत मंजूर असलेले राजपूरी ह्या कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले.तसेच नाबार्ड टप्पा क्र.२४ अंतर्गत मंजूर असलेले नांदगाव हे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हयात बियाणे व किटकनाशकांचे गुण नियंत्रण करणारी सुसज्ज यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत

**(३) ८७६७ (१३-०७-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयामध्ये बियाणे व किटकनाशकांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना बनावट बियाणे व किटकनाशके विकली जात असल्याचे माहे मे, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यवतमाळ जिल्हयामध्ये बोगस बियाणांमुळे ५ हजार हेक्टरवरील उन्हाळी भुईमूगाचे पिकाचे नुकसान झाल्याने बोगस बियाणे देणाऱ्या कंपन्यावर कारवाई करुन नुकसानग्रस्त भुईमूग उत्पादक शेतकऱ्यांना

आर्थिक मदत देण्याची मागणी शेतकऱ्यांनी माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ऊक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या यवतमाळ जिल्ह्यात बनावट बियाणे व किटकनाशकांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करुन बियाणे व किटकनाशकांचे गुण नियंत्रण करणारी सुसज्ज यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१४-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) यवतमाळ जिल्ह्यातील भुईमूग पिकाच्या तक्रारींच्या अनुषंगाने कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांचा समावेश असलेल्या समितीने क्षेत्रिय पाहणी केलेली आहे. उन्हाळी हंगामात भुईमुग पिकाच्या लागवडीमध्ये पीक फुलोरा अवस्थेत असताना वातावरणातील अचानक झालेल्या बदलामुळे पिकांच्या वाढीमध्ये अनियमितता होऊन पिके पिवळी पडली आहेत. त्यामुळे आऱ्या व शेंगा लागण्याचे प्रमाण कमी होऊन भुईमूग पिकाच्या उत्पादनात घट येण्याची शक्यता आहे असा निष्कर्ष समितीने दिला आहे. यासंदर्भात भुईमुग पिकाच्या उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रावर मार्गदर्शन करण्यात आले आहे. भुईमुग पिकाचे नुकसान हे वातावरणातील बदलामुळे झालेला असून बियाणांमध्ये कोणताही दोष आढळून आलेला नसल्याने बियाणे कंपन्यावर कारवाई करण्यात आलेली नाही.
(३) सन २०२१-२२ मध्ये यवतमाळ जिल्ह्यात अनधिकृत बियाणे, अनधिकृत रासायनिक खते आणि किटकनाशके यांचा साठा जप्त करण्यात आला असून अनधिकृत विक्री करणारे विक्रेते यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

यवतमाळ जिल्ह्यामध्ये बियाणे, खते व किटकनाशके गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर १ भरारी पथक व तालुकास्तरावर एकूण १६ असे एकूण १७ भरारी पथके स्थापन केलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील थळ नवगाव या प्रकल्पबाधित मच्छिमार बांधवांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) ९००५ (१५-०७-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील थळ नवगाव येथे आरसीएफ प्रकल्पबाधित मच्छिमार बांधवांच्या समस्यांबाबत महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४ फेब्रुवारी, २०१९ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये मा.उप सभापती यांनी या प्रकल्पबाधित मच्छिमार बांधवांच्या समस्या सोडण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, रायगड यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्देशानुसार मच्छिमार बांधवांना रस्ता, पाणी, वीज, प्रसाधन गृह अशा मुलभूत सुविधा देण्याबाबत निदेश देण्यात येवूनही अद्याप मच्छिमार बांधवांच्या समस्यांचे निरासन झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पबाधित मच्छिमार बांधवांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (२४-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे. दिनांक २४/०२/२०१९ रोजी विधान परिषदेचे उपसभापती यांच्या अध्यक्षतेखाली अलिबाग तालुक्यातील थळ नवगाव येथील आरसीएफ प्रकल्पबाधित मच्छिमार बांधवांच्या समस्यांबाबत बैठक घेण्यात आली.

(२) हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र मत्स्योदयोग विकास महामंडळ कार्यालयामार्फत नावेदार नवगाव, (ता.अलिबाग, जि.रायगड) या कामाचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झालेले असून रुपये १६.१५ कोटीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

# मौजे धामणगाव-कोशिमशेत (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील रोजगार हमी योजनेंतर्गत घरकुलांच्या कामाची रक्कम लाभार्थ्यांना अदा करण्याबाबत

**(५) ९२८४ (२१-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धामणगाव-कोशिमशेत (ता.मोखाडा, जि.पालघर) येथे सन २०१८-२०१९ मध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत घरकुलांची कामे करण्यात आली होती, सदर धामणशेत-कोशिमशेत ग्रामपंचायतीमधील २९ लाभार्थ्यांना गेल्या २ वर्षापासून केलेल्या कामाच्या हप्त्याची रुपये ५ लाख २२ हजार इतकी रक्कम अद्याप मिळाली नसल्याचे दिनांक १६ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरकुलाच्या योजनेचा लाभ लाभार्थ्यांना देण्याकरीता समर्थन या सामाजिक संस्थेने प्रथम दिनांक ५ जानेवारी, २०१९ रोजी गटविकास अधिकारी, मोखाडा यांना व दिनांक ११ फेब्रुवारी, २०२० रोजी जिल्हाधिकारी, पालघर यांना निवेदन दिले, तद्नंतर उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक जि.प. पालघर यांना दिनांक २२ फेब्रुवारी, २०२० रोजी पत्र देऊन तसेच त्यानंतर दिनांक ५ फेब्रुवारी, २०२१ रोजी मा.रोजगार हमी मंत्री यांनाही लेखी निवेदने देऊनही घरकुलाच्या योजनेचा लाभ लाभार्थ्यांना देण्याबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांची रक्कम प्रलंबित ठेवणाऱ्या बेजबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन घरकुलांच्या कामांची रक्कम लाभार्थ्यांना अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०३-१२-२०२१) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पालघर यांनी चौकशी केली असता, २९ लाभार्थ्यांपैकी २२ लाभार्थ्यांचे वर्ककोड नरेगा NIC पोर्टलवर त्यांच्या घराच्या कामांच्या टप्प्यानंतर विलंबाने जनरेट झाल्यामुळे मस्टर वेळेत काढता आले नसल्याने त्यांना Convergence अंतर्गत मजुरीचा लाभ मिळाला नाही. तसेच, उर्वरित ७ लाभार्थ्यांना २०१६-१७ मधील शबरी आवास योजनेतील ऑनलॉईन नोंदणी करताना त्यांचे जॉबकार्ड न नोंदविताच नोंदणी केल्याने त्यांचे वर्ककोड जनरेट झाले नसल्याने त्यांना लाभ मिळालेला नाही. म्हणून त्यांना मनरेगा मार्फत मजुरी देणे शक्य झाले नाही.

तरी, २९ लाभार्थ्यांची रक्कम जिल्ह्याच्या eFMS खात्यात उपलब्ध करून देऊन सदरचा निधी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मोखाडा यांच्या मार्फत संबंधित लाभार्थ्यांना त्यांची मजुरी रक्कम अदा करण्याचे जिल्हा परिषद, पालघर यांनी दिनांक ०२/१२/२०२१ च्या पत्रान्वये शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उलवे (जि.रायगड) मध्ये नवीन पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबत

**(६) ९४२६ (१३-०७-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील उलवे नोड येथे वाढत्या लोकसंख्येसह गुन्हेगारीचे प्रमाण सुध्दा वाढत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उलवेमध्ये वाढत्या गुन्हेगारीचे प्रमाण रोखण्याकरिता उलवेसाठी स्वतंत्र नवीन पोलीस स्टेशन निर्माण करण्याची मागणी नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उलवेसाठी स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०५-०१-२०२२) :** (१) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडील उलवे (उलवे नोड) नवी मुंबई हा परिसर न्हावाशेवा पोलीस ठाणे व एन.आर.आय.सागरी पोलीस स्टेशन हद्दित येत आहे. उलवे (उलवे नोड) नवी मुंबई येथे सन २०१८, २०१९, २०२० व सप्टेंबर २०२१ पर्यंत दाखल गुन्हयांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| सन | दाखल गुन्हे |
|---|---|
| २०१८ | ११० |
| २०१९ | १६६ |
| २०२० | १५२ |
| सप्टेंबर २०२१ पर्यंत | ११६ |

(२) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडील उलवे नोड परिसर नव्याने विकसित होत असल्याने काही परिसर हा न्हावाशेवा पोलीस ठाणे हद्दित तर काही परिसर एनआरआय सागरी पोलीस ठाणे हद्दित येत असल्याने येथील नागरीकांची स्वतंत्र नवीन पोलीस स्टेशन होणबाबतची मागणी केली आहे.
(३) याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाकडील दिनांक १८/०२/२०२१ च्या प्रस्तावानुसार उलवेसाठी स्वतंत्र नवीन पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबत महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या पदाचा आढावा व सुधारीत आकृतीबंधाचा एकत्रित प्रस्ताव मान्यतेसाठी वित्त विभागास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्दयांनुसार शासनाच्या दिनांक १७/०८/२०२१ च्या पत्रान्वये पोलीस महासंचालक कार्यालयास नवीन पद निर्मीतीचा प्रस्ताव स्वतंत्ररित्या फेर सादर करण्याबाबत कळविण्यात आले असून कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्हयात पाणंद रस्ते/शेत रस्ते दुरुस्ती संदर्भात योजनेची अंमजबजावणी करण्यात येत नसल्याबाबत

**(७) ९५५२ (१५-०७-२०२१) श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात शासनामार्फत पाणंद रस्ते/ शेत रस्ते दुरुस्ती/ निर्मितीसंदर्भात योजना राबविण्यात येत असून सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येत नसल्यामुळे पाणंद रस्ते/शेत रस्ते निर्मिती व दुरुस्ती ही केवळ कागदोपत्री दाखवून अकोला जिल्ह्यात शासन निधीचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येत नसल्यामुळे जमिनीचा बहुतांश भाग शेतात वाहून गेल्यामुळे शेतमाल ने-आण करणे तसेच यांत्रिकीकरण करणे शेतकऱ्यांना त्रासदायक होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त योजनेची अंमलबजावणी न करता निधीचा अपहार करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करून पाणंद रस्ते/शेत रस्ते दुरुस्ती/निर्मिती योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१६-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील बटवारी खु.व बारालिंगा या ग्रामपंचायतीमधील शेतरस्त्यांच्या कामाचे कुशल निधीचे दोन निधी वितरण आदेश (FTO) मंजुरीशिवाय अनावधानाने आहरीत करण्यात आले होते. सदर बाब संबंधितांच्या लक्षात आल्यावर दुसऱ्याच दिवशी आहरीत निधी जिल्हाधिकारी, अकोला यांच्या रोजगार हमी योजनेच्या खात्यात जमा करण्यात आला आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील लाचखोरांची प्रकरणे निकाली काढण्याबाबत

**(८) ९८८५ (१५-०७-२०२१) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) केलेल्या कार्यवाहीनुसार लाच मागण्यात आणि स्वीकारण्यात राज्यातील महसूल विभाग, पोलीस दल आणि महानगरपालिका-नगरपालिकांमधील अधिकारी/कर्मचारी यांचे प्रमाण अधिक असल्याचे दिनांक १३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसीबीने दिलेल्या आकडेवारीनुसार गेल्या दीड वर्षामध्ये लाच मागणे व स्वीकारणे याची किती प्रकरणे अंतिम कारवाईविना प्रलंबित आहेत, उक्त प्रकरणे अंतिम कारवाईविना प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील लाचखोरांवरील प्रकरणे निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०९-१२-२०२१) :** (१) होय.

(२) दिनांक ०१/०५/२०२० ते ३१/१०/२०२१ या कालावधीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे लाच मागणी व स्विकारल्याबाबत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| विभाग | दिनांक ०१/०५/२०२० ते दिनांक ३१/१०/२०२१ या कालावधीत सापळा गुन्हयांची सांख्यिकी माहिती. | | |
|---|---|---|---|
| | स्विकारली | मागणी | एकूण |
| महसूल | २१२ | ४५ | २५७ |
| पोलीस | १८१ | ८१ | २६२ |
| मनपा | ४९ | ०६ | ५५ |
| इतर विभाग | ४२४ | ६९ | ४९३ |
| एकूण | ८६६ | २०१ | १०६७ |

(३) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईमध्ये दोषी आढळलेल्या लोकसेवकांपैकी डिसेंबर, २०२० अखेर एकूण २३५ लोकसेवकांना निलंबित न केल्याचे आढळून आले आहे. या अनुषंगाने संबंधित प्रशासकीय विभागांना उचित कार्यवाही करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

तसेच मुख्य सचिव यांनी दिनांक ०१/१०/२०२१ रोजी बैठक आयोजित करुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडील संबंधित प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सर्व विभागांना सुचना दिल्या आहेत. त्यानुसार संबंधित प्रशासकीय विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरातील आयटी कंपनीत नोकरी करणाऱ्या महिलेवर अत्याचार झाल्याबाबत

**(९) १०१०४ (१५-०७-२०२१) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील आयटी कंपनीत नोकरी करणाऱ्या एका तरुणीला ओला कॅब चालकाने गुंगी येणारे औषध टाकलेले पाणी पिण्यास देऊन तिच्यावर बलात्कार केल्याचा घटना हडपसर येथील पोलीस ठाणे अंतर्गत माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेमुळे नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करुन आयटी कंपनीत नोकरी करणाऱ्या महिलांना सुरक्षित प्रवास करता यावा यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) होय, यासंदर्भात हडपसर पोलीस ठाणे, पुणे शहर येथे गु.र.क. २८४/२०२१ भा.द.वि कलम ३७६,३२८,५०६ अन्वये दिनांक ०९/०४/२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) सदरील घटनेच्या अनुषंगाने फिर्यादी पिडीत महिला यांच्याकडे चौकशी करण्यात आली असता आरोपी ओला कॅबचा चालक याने फिर्यादी यांना त्यांचे घरी सोडण्याकरीता घेऊन जात असताना फिर्यादी यांना गुंगी येण्याचे औषध दिले व गुंगी आल्याने फिर्यादी या बेशुध्द झाल्याने तिला लॉजवर घेऊन जाऊन बलात्कार केला, फिर्यादी शुध्दीवर नसताना तीचे मोबाईलमध्ये फोटो काढून, फोटो सोशल मिडीयावर व्हायरल करण्याची धमकी देऊन फिर्यादीवर वारंवार इच्छेविरुध्द बळजबरीने शरीरसंबध केल्याने गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे आरोपीचे तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे तपास करण्यात येत आहे. तो मिळून येताच त्यास अटक करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

आय.टी. तसेच विविध क्षेत्रातील काम करणाऱ्या महिलांना सुरक्षित व निर्भय वातावरण निर्माण करणे व त्यांच्याबरोबर कोणताही घातपात घडू नये म्हणून बडी कॉप हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. यामध्ये स्थानिक पोलीस ठाण्याचे महिला अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश करुन आयटीमध्ये काम करणाऱ्या महिलांचा व्हॉटसअप ग्रुप तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये महिलांच्या संपर्कात राहून मदत पुरविण्यात येते. त्याचप्रमाणे दामिनी मार्शल महिला पोलीस कर्मचारी नियुक्ती करण्यात आली असून नोकरी करणाऱ्या महिला व मुली यांना तात्काळ मदत देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर येथे विषारी वायु गळतीमुळे मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१०) १०२८८ (२३-११-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दौंड, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहराजवळील ऊर्जापूर-दुर्गापूर भागात (वार्ड क्र.३) दिनांक १३ जुलै, २०२१ रोजी डिझेलवर चालणाऱ्या जनरेटमधून विषारी वायुगळती होऊन लष्करे कुटुंबांतील नववधूसह ६ व्यक्तींचा गुदमरुन मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करुन दुर्घटनेमुळे मृत्यू पावलेल्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१०-१२-२०२१) :** (१) होय.

फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दुर्गापूर, जिल्हा चंद्रपूर येथे अकस्मात मृत्यू क्र. २७/२०२१ कलम १७४ जा. फौ. प्रमाणे नोंद केली आहे.

(२) होय.

सदर दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी मा.श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी केली आहे.

(३) सदर अकस्मात मृत्यू प्रकरणी मृत्यू पावलेल्या सर्व मृतकांचे शवविच्छेदन अहवाल प्राप्त करण्यात आले असून वैद्यकिय अधिकारी यांनी मृत्यूचे कारण opinion Reserved however sample preserved for CA and histopathlogy असे नमूद केले आहे. विद्युत निरीक्षक, विद्युत कार्यालय रामनगर, चंद्रपूर यांचेकडून विविध मुद्दयावर माहिती प्राप्त करण्यात आली असता घटनेवेळी जनरेटर उघड्या जागेऐवजी बंद खोलीत सुरु असल्याने त्यांच्या Exaust मधुन निघणाऱ्या धुराच्या संपर्कात आलेल्या व्यक्तीचा गुदमरुन मृत्यू घडला असावा असा अभिप्राय दिलेला असून सदर प्रकरणात पुढील चौकशी सुरु आहे.

सदर प्रकरणातील मृत्यू पावलेल्या मृतकांचे नातेवाईकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन विशेष बाब म्हणून मृतांच्या ३ कायदेशीर वारसांना प्रत्येकी २,००,०००/- याप्रमाणे रुपये ६,००,०००/- इतके अर्थसहाय्य मंजूर केले असून धनादेश वितरीत करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला (जि.अकोला) तालुक्यातील पाणंद रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(११) १०२९७ (१४-११-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) तालुक्यातील काळबाई, कसारखेड, जुना हायवे, शेळंद, देगांव, कान्हेरसरप, खिरपुरी, नांदखेड, टाकळी, खुरेशी इ. शिवारात माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये अतिपावसामुळे पाणंद रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतामध्ये जाणारे पाणंद रस्ते चिखलमय व खराब झाल्याने सदर रस्त्यावरुन वाहने चालविणे, पायी चालणे अवघड झाल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पाणंद रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१०-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

अकोला जिल्हातील बाळापुर व बार्शिटाकळी तालुक्यातील नमुद गावांमध्ये माहे सप्टेंबर-ऑक्टोबर २०२१ मध्ये झालेल्या अतिपावसामुळे पाणंद रस्त्यांची दुरावस्था झाली आहे.

(२) होय, हे ही खरे आहे.

(३) बाळापुर तालुक्यातील शेळद, देगांव खिरपुरी नांदखेड, टाकळी, या गावांतील पाणंद रस्ते पालकमंत्री/शेत/पाणंद रस्ते योजना कृती आराखड्यात असून दुरुस्ती करावयाचे नियोजीत आहे. तसेच, काळबाई, कासारखेड, टाकळी खुरेशी गावांतील पाणंद रस्त्यांना पालकमंत्री पाणंद रस्ता कृती आराखड्यात समाविष्ट करुन दुरुस्ती करण्यात येणार असल्याची माहिती क्षेत्रिय कार्यालयामार्फत प्राप्त झाली आहे.तसेच बार्शिटाकळी तालुक्यातील कोन्हेरी सरप गावातील रस्त्यांचा समावेश कृती आराखड्यात असून डिसेंबर अखेर काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(४) निरंक.

---

## महाराष्ट्र राज्य सहकारी दूध उत्पादक संघ (महानंद) ला मदत देण्याबाबत

**(१२) १०३११ (१४-११-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र राज्य सहकारी दूध उत्पादक संघ (महानंद) डबघाईला आल्याने महानंद दूध उत्पादक महासंघावर प्रशासक नेमण्याची मागणी महानंद ने शासनाकडे केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेचे पालक-चालक आणि संस्थाचालकांच्या दुर्लक्षामुळे भ्रष्टाचार होत असल्याने हजारो कर्मचाऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महानंद ला मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (१०-१२-२०२१) :** (१) महासंघ कर्मचारी विकास कृती समिती तसेच लोकप्रतिनिधी यांच्याकडून महानंद दूध उत्पादक महासंघावर प्रशासक नेमण्यासाठीची निवेदने शासनाकडे प्राप्त झालेली आहेत.

(२) लॉकडाऊनच्या काळात खाजगी बाजारात दुधाचे दर कमी झाले असतानाही शासनाने विहित केलेल्या दराने दूध खरेदी व वरवंड प्रकल्पातून दूध भुकटी व बटर यासाठी केलेली गुंतवणूक, दिवसेदिवस कमी होत चाललेली दूध विक्री यामुळे महाराष्ट्र राज्य दूध संघाची आर्थिक स्थिती खालावली आहे. परिणामी संचित तोट्यात ही वाढ आली आहे ही वस्तुस्थिती आहे.

(३) महानंदास बळकटी प्राप्त करुन देण्याच्या उद्देशाने शासनाने दूध भुकटी व बटर यांच्यास्वरुपात सुमारे रुपये ७० कोटी इतके अर्थसहाय्य महानंदास भांगभांडवली स्वरुपात उपलब्ध करून दिले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात महिला अत्याचारवरील गुन्हे जलदगती न्यायालयात चालवून निकाली काढण्याबाबत

**(१३) १०३२० (२३-११-२०२१) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रविंद्र फाटक, श्री.प्रसाद लाड, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्युरो ने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार सन २०१९ अखेरीस राज्यात महिला अत्याचार गुन्ह्यांशी संबंधित २ लाख ७ हजार (९४ टक्के) खटले प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साडेनऊ हजार खटल्यांमधील आरोपी पुराव्यांविना निर्दोष सुटले असून राज्यातील दोषसिध्दी दर खुप कमी १३.७ टक्के असून कायद्यातील विविध पळवाटा तसेच पुरावे गोळा करण्यास होणारी दिरंगाई दोषसिध्दीसाठी होणाऱ्या विलंबामुळे गुन्हेगार सुटत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत प्रत्येक महिन्यात २० किंवा त्यापेक्षा जास्त बलात्काराचे गुन्हे व ४० किंवा त्यापेक्षा जास्त विनयभंगाचे गुन्ह्यांची नोंद झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून निर्भया प्रकरणानंतर कायद्यामध्ये अनेक नवीन तरतुदी करण्यात येवून त्याची अंमलबजावणी होत नसल्याकारणाने तसेच सदर गुन्ह्याप्रकरणी आरोपीवर तात्काळ कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये कायद्याचा धाक राहत नसून महिलांच्या सुरक्षिततेचा गंभीर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महिला अत्याचार गुन्हा संबंधित कायदा कडक करुन याबाबतचे गुन्हे जलदगती न्यायालयात चालवून निकाली काढण्याबाबत तसेच महिला सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१७-१२-२०२१) :** (१) नॅशनल क्राइम रेकोर्ड ब्युरोने सन २०२० मध्ये प्रकाशित केलेल्या अहवालानुसार सन २०१९ पर्यंतचे २,०७,२०३ गुन्हे न्यायप्रविष्ट आहेत.

(२) नॅशनल क्राइम रेकोर्ड ब्युरोने सन २०२० मध्ये प्रकाशित केलेल्या अहवालानुसार ३६५५ खटल्यांमधील आरोपी निर्दोष सुटले आहेत. यामध्ये राज्याचा दोषसिध्दीचा दर १५.३ आहे.

आरोपी निर्दोष सुटण्याच्या कारणामध्ये फिर्यादी फितूर होणे, साक्षीदार फितूर होणे, संमतीचे गुन्हे असणे, फिर्यादीकडून गुन्हा विलंबाने दाखल करणे, साक्षीदार न मिळणे, सुनावणीस विलंब होणे, इ. कारणे आहेत.

(३) पोलीस आयुक्तालय, ठाणे हद्दीत माहे जानेवारी, २०२१ ते माहे ऑगस्ट, २०२१ या कालावधीत बलात्कार- १८३ व विनयभंग- ३३६ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

बलात्कार, विनयभंग, छेडछाड, ॲसिड हल्ला या महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमधील आरोपींना जास्तीत-जास्त शिक्षा होण्याच्या दृष्टीने प्रचलीत कायद्यात सुधारणा करून केंद्र शासनाने फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम, २०१८ पारित करण्यात येऊन सदर गुन्ह्यांच्या शिक्षेमध्ये वाढ करण्यात आली आहे. बलात्कार किंवा बलात्कार करण्याचा प्रयत्न किंवा बालिकेविरूध्द अत्याचार तसेच विनयभंग या गुन्ह्याबाबतीत तक्रार नोंदविण्यापासून ते त्या गुन्ह्यांची निर्गती करेपावेतो म्हणजे मा.न्यायालयात दोषारोप सादर करावयाच्या टप्प्यापावेतो पोलीस विभागाकडून या गुन्ह्यात कशाप्रकारे अंमलबजावणी प्रक्रिया करावी याबाबत Standard Operating Procedure (SOP) सर्व पोलीस घटक तसेच सर्व प्रशिक्षण केंद्र यांना दिनांक १२/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सूचित करण्यात आले आहे.

(४) फौजदारी कायदे (सन २०१८ ची दुसरी सुधारणा) अन्वये बलात्कारांच्या गुन्ह्यांमध्ये शिक्षेत वाढ करण्यात आली आहे.

तसेच अशा गुन्ह्यांचा तपास २ महिन्यांच्या आत करणे हे चौकशी अधिकाऱ्यांवर बंधनकारक करण्यात आले आहे. बलात्कार, विनयभंग, छेडछाड, ॲसिड हल्ला या महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमधील आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा होण्याच्या दृष्टीने प्रचलीत कायद्यात सुधारणा करून शासनाने फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम, २०१८ पारित केला आहे.

महिला व बालकांवरील अत्याचाराबाबतच्या तक्रारींची तात्काळ व संवेदनशीलपणे दखल घेण्याबाबतच्या सूचना दिनांक ०९/१२/२०१९ आणि दिनांक १८/११/२०२० रोजीच्या पत्रान्वये सर्व पोलीस घटकांना देण्यात आलेल्या आहेत.

अल्पवयीन पिडीत मुली व महिलांविरूध्दच्या गुन्ह्याचा तपास विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी आयुक्तालय स्तरावर संबंधित पोलीस उप आयुक्त यांनी तर जिल्हा स्तरावर संबंधित पोलीस अधीक्षक यांनी वेळोवेळी आढावा घेण्याबाबत शासनाच्या दिनांक ०९/०७/२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

महिला व बालकांवरील लैंगिक अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्याबाबतच्या उपाययोजना करण्याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून दिनांक ०२/०८/२०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व पोलीस घटकांना सूचित करण्यात आले आहे. महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी राज्यात १३८ विशेष न्यायालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहेत.

भारतीय दंड सहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ व लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ हे अधिनियम महाराष्ट्र राज्यात लागू असताना त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरीता सन २०२० चे विधानसभा विधेयक क्र. ५१ शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक हे दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात आले असून, येत्या हिवाळी अधिवेशनामध्ये संयुक्त समितीचा अहवाल विधानमंडळ सभागृहासमोर सादर करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवीन मासेमारी कायद्यानुसार राज्यात पर्ससीन नेट व एलईडी लाईटद्वारे मासेमारी रोखण्याबाबत

**(१४) १०७५९ (०२-१२-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १ जानेवारी ते ३१ मे पर्यंत पर्ससीन नेट मासेमारीला बंदी असूनही पर्ससीन नेटधारक प्रतिबंधित पर्ससीन नेट व एलईडी लाईट द्वारे मासेमारी करत असल्याचे निदर्शनास आले असून पर्ससीन नेट धारकांवर मत्स्यव्यवसाय विभागाकडून कारवाई केली जात नसल्याने पारंपारिक मच्छिमारांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्ससीन नेटधारकावर कारवाई करावी या मागणीसाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पारंपारिक मच्छिमारांनी सहाय्यक आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संपूर्ण समुद्र किनारपट्टीवर पर्ससीन नेटधारकांना १ जानेवारी ते ३१ मे पर्यंत बंदी घालण्याकरीता शासनाचा नवा मासेमारी कायदा अस्तित्वात येत असून या कायद्यात एलईडी आणि पर्ससीन मासेमारी तसेच महाराष्ट्राच्या जलधी क्षेत्रात घुसून अवैध मासेमारी करणाऱ्या परराज्यांतील नौकांविरोधात दंडात्मक तरतुदी करण्यात आल्या असल्याने नवा कायदा पारंपरिक मच्छिमारांच्या हिताचा असेल असे आश्वासन मा.मत्स्यव्यवसाय मंत्री यांनी माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नव्या कायद्यामुळे मच्छिमार बांधवांना कोणकोणते फायदे होणार आहेत, सुधारित कायद्यात बदल झाल्यामुळे या अनुषंगाने अवैध मासेमारीबाबत कठोर शास्तीच्या तरतुदी, राज्याच्या जलधी क्षेत्रात बेकायदेशीरपणे परप्रांतीय मासेमारी, बेकायदेशीर एलईडी व पर्ससीन मासेमारी करणाऱ्या नौकांवर वचक निर्माण होण्यासाठी अधिकचे शास्तीचे, दंडाचे प्रयोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवीन मासेमारी कायद्यानुसार राज्यात पर्ससीन नेट व एलईडी लाईट द्वारे मासेमारी रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (१०-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) राज्याच्या जलधी क्षेत्रात बेकायदेशीर परप्रांतीय मासेमारी, बेकायदेशीर एलईडी व पर्ससीन मासेमारी करणाऱ्या नौकांवर वचक निर्माण होण्यासाठी अधिकच्या शास्ती व दंडाच्या तरतुदीबाबत दिनांक २३/११/२०२१ रोजी "महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) अध्यादेश, २०२१" प्रख्यापित करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विक्रमगड (जि.पालघर) तहसिल कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१५) १०८१९ (१५-११-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तहसिल कार्यालयात ६२ पदांपैकी २८ पदे रिक्त असून ३५ अधिकारी/कर्मचारी यांना संपूर्ण तालुक्याचा कारभार पहावा लागत आहे, अपुरा अधिकारी/कर्मचारीवर्ग यामुळे कामाचा ताण वाढला असून तालुक्यातील रेशनिंग, विविध शासकीय योजना, अधिवास, जन्मतारखेचा दाखला आदी विविध कामे प्रलंबित राहत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विक्रमगड तहसिल कार्यालयाची अत्यंत दुरवस्था झाली असून कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांना बसण्याची योग्य व्यवस्था नसून कार्यालयाच्या नवीन इमारतीचा प्रस्ताव मंजूरीविना अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विक्रमगड तहसिल कार्यालयाची इमारत बांधणी व रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विक्रमगड तहसिल कार्यालय पुनर्बांधणी व कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०३-१२-२०२१) :** (१), (२), (३), (४) व (५) विक्रमगड तहसिल कार्यालयाकरीता एकूण ५५ पदे मंजूर असून माहे ऑक्टोबर २०२१ अखेर पर्यंत २८ पदे भरलेली असून उर्वरित २७ पदे रिक्त आहेत.

विक्रमगड तालुक्यामध्ये संजय/इंदिरा गांधी योजना व पुरवठा विभागाची शाखा मंजूर नसल्याने, त्या विभागांची कामे ही महसूल शाखेतील अधिकारी/ कर्मचाऱ्यांकडून करुन घेतली जात असल्याने सदर कामाचा निपटारा करण्यात येत आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व अन्न व नागरी पुरवठा विभाग यांच्याकडे सदर शाखा व तेथील पदांना मंजूरी देण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे.

विक्रमगड तहसिल कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक २८/०७/२०२१ च्या निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधींनी जलसंपदा विभागाकडे विनंती केलेली असून, त्यानुषंगाने विक्रमगड तहसिल कार्यालयाला देहर्जे प्रकल्पाची जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही जलसंपदा विभागाद्वारे प्रस्तावित आहे.

---

## राज्यात फायनान्स कंपन्या व बँक कर्ज वसुलीसाठी तगादा लावत असल्याबाबत

**(१६) १११६२ (०२-१२-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना महामारीच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेत छोटे व्यवसायिक, कारागीर, लघु उद्योजक यांचे व्यवसाय बंद होऊन आर्थिक व्यवहार बंद झाल्याने सदरहू व्यवसायिकांकडून कर्ज वसुली करीता फायनान्स कंपन्या व बँका तगादा करीत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्ज वसुलीसाठी मुदतवाढ देण्यासंदर्भात फायनान्स कंपन्या व बँकांना शासनाने निर्देश देवूनही फायनान्स कंपन्या व बँकेद्वारे जबरदस्तीने कर्ज वसुली करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोरोना महामारीच्या कालावधीत कर्ज वसुलीसाठी मुदतवाढ देण्याबाबत शासनाने निदेश देऊनही संबंधितांकडे कर्ज वसुलीचा तगादा लावणाऱ्या फायनान्स कंपनी व बँक यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१७-१२-२०२१) :** (१) राज्यात कोरोनाच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेत छोटे व्यवसायिक, कारागीर, लघु उद्योजक यांचे व्यवसाय बंद असल्याने त्यांचे आर्थिक व्यवहार बंद झाले आहे, असे व्यवसायिकांकडे फायनान्स कंपन्या व बँका कर्ज वसुलीसाठी तगादा करीत असल्याची कोणतीही तक्रार माहे मे, २०२१ वा त्यादरम्यान प्राप्त झालेली नाही.
(२) यवतमाळ जिल्ह्यात सन २०२० मध्ये शेतीकरीता कर्ज घेवून खरेदी करण्यात आलेला महिद्रा कंपनीच्या ट्रॅक्टर चे हप्ते न भरल्याने इंण्डस्ड फायनान्स कंपनी, यवतमाळ यांच्या वसुली अधिकाऱ्याने ट्रॅक्टर परत नेवून फिर्यादीचा विनयभंग केल्या प्रकरणी पोलीस स्टेशन घाटंजी, यवतमाळ येथे दिनांक ०४/०३/२०२० रोजी गु.र.क्र.१४४/२०२० कलम ३५४, ३५४(अ), ५०४ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंदविला आहे.
(३) सदर प्रकरणी दोषारोपपत्र सि. सि. क्र १५५/२०२० अन्वये मा.न्यायालयात सादर केले आहे. फायनान्स कंपन्या व बँकेव्दारे जबरदस्तीने कर्ज वसूली करीत असल्याची तक्रार प्राप्त होताच वेळीच गुन्हे नोंदवून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## साकोली (जि.भंडारा) तालुक्यातील शेततळ्यांच्या रखडलेल्या कामाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१७) ११२५२ (१४-११-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकोली (जि.भंडारा) तालुक्यात पावसाच्या लहरीपणामुळे पाण्याची पातळी खालावल्याने शासनाने एकूण ६९ शेततळी खोदली यापैकी ३ शेततळ्यांचे काम पूर्ण झाले व उर्वरित शेततळ्यांची कामे निधीअभावी रखडली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साकोली तालुक्यातील शेततळ्यांच्या कामांकरीता निधी उपलब्ध करुन देवून सदरहू योजना प्रभावीपणे राबविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन साकोली तालुक्यातील शेततळ्यांची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०१-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

साकोली (जि.भंडारा) मध्ये एकूण ६९ शेततळ्यांची कामे पूर्ण झालेली असून या शेततळ्यांना अनुदान अदा करण्यात आलेले आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंदिया जिल्ह्यात अवकाळी पाऊसामुळे बाधित झालेल्या नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत

**(१८) ११२७९ (११-११-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात अवकाळी पाऊसामुळे शेतकऱ्यांच्या घरांचे, धान पिकांचे, भाजीपाला, फळबागा पिकांचे नुकसान झाल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवकाळी पाऊसामुळे नुकसान झालेल्या पिकांचे व घरांचे पंचनामे करुन बाधितांना नुकसान भरपाई देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांनी जिल्हाधिकारी, गोंदिया यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०७-१२-२०२१) :** (१) व (२) खरे आहे.

(३) गोंदिया जिल्ह्यामध्ये माहे मे, २०२१ वा त्यादरम्यान अवकाळी पावसामुळे एकूण ६४१ शेतकऱ्यांचे २१८.२१ हेक्टर आर क्षेत्राचे नुकसान झाले असून त्याकरीता शासन निर्णय, दिनांक ०६/१०/२०२१ व शुध्दीपत्रक दिनांक ०८/१०/२०२१ अन्वये गोंदिया जिल्ह्याकरीता रुपये २९,८८,८००/- इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला असून निधी वाटपाची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबई येथे मराठी भाषा भवनाचे उपकेंद्र असलेली बहुउद्देशीय इमारत उभारण्याबाबत.

**(१९) ११३८४ (११-११-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अमोल मिटकरी, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नवी मुंबई येथे मराठी भाषा भवनाचे उपकेंद्र उभारण्यासाठी भूखंड मिळावा याकरीता सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सिडको प्रशासनाकडे प्रस्ताव सादर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार नवी मुंबईतील ऐरोली येथील सेक्टर १३ मधील ३००० चौ.मी. एवढा भूखंड सिडको प्रशासनाने मराठी भाषा भवनाच्या उपकेंद्रासाठी दीर्घ मुदतीकरीता भाडेपट्टयाने दिला असून सदर जागेचा ताबा देखील शासनाने घेतला असल्याचे दिनांक १३ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या नियोजनानुसार सदर उपकेंद्र इमारत बहुउद्देशीय सामाईक सुविधायुक्त राहणार असून त्यामध्ये ग्रंथालय, सभागृहे, भाषा विषयक विविध उपक्रमाची कार्यालये तसेच म.रा.साहित्य आणि संस्कृती मंडळ, म.रा. विश्वकोष निर्मिती मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्था इ. संस्थांची कार्यालये या एकाच इमारतीत सुरु करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बहुउद्देशीय मराठी भाषा उपकेंद्र उभारणीसाठी केलेली आर्थिक तरतूद, अपेक्षित खर्च व बांधकाम पूर्णत्वाचा कालावधी इत्यादी बाबींची पूर्तता करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (०७-१२-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

मराठी भाषा भवन उपकेंद्र उभारणीकरीता दिनांक ०५/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये ऐरोली, नवी मुंबई, सेक्टर १३ मधील २००० चौ.मी. व दिनांक २४/०७/२०१९ च्या शासन निर्णयान्वये अतिरिक्त १०१८.७२ चौ.मी. अशी एकूण ३०१८.७२ चौ.मी. इतकी जागा शहर आणि औद्यागिक विकास महामंडळाकडून (सिडको) ६० वर्षांकरीता नोंदणीकृत भाडेपट्टीने (नोंदणी क्र.ट.न.न.७५२८/२०२१) रुपये ५.९० कोटी इतके शुल्क अदा करून संपादित करण्यात आली आहे. सदर जागेचा प्रत्यक्ष ताबा शासनाने दिनांक १६/०७/२०२१ रोजी घेतला आहे.

(३) अंशत: खरे आहे.

मराठी भाषा विभागाच्या अधिपत्त्याखालील महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी, मुंबई येथील मध्यवर्ती कार्यालय आणि भाषा संचालनालय यांचे कोकण भवन येथील प्रादेशिक कार्यालय, अशी दोन कार्यालये मराठी भाषा भवन उपकेंद्र, ऐरोली येथे स्थानांतरित करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच बदलापूर येथील मध्यवर्ती ग्रंथालयही या ठिकाणी स्थानांतरित करण्याचे प्रस्तावित आहे. याबाबत अंतिम निर्णय इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर घेण्यात येणार आहे.

(४) मराठी भाषा भवन उपकेंद्राच्या बांधकामासाठी अंदाजे एकूण रुपये २७.०० कोटी इतका खर्च अपेक्षित असून चालू आर्थिक वर्षामध्ये सदर बांधकामासाठी रुपये १०.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. सदर इमारतीचे बांधकाम भाडेपट्टी कराराच्या दिनांकापासून पुढील चार वर्षात पूर्ण करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईसह राज्यातील पोलिसांना आरोग्य सुविधा आणि हक्काचे घर मिळण्याबाबत

**(२०) ४६९३८ (१०-०७-२०१९) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यातील पोलिसांना अनेक वर्षे पोलीस दलात सेवा करूनही हक्काचे घर मिळत नसणे, गंभीर आजारांसाठी पोलिसांना ठराविक खाजगी रुग्णालयात मोफत उपचार मिळणे मात्र इतर आजारांसाठी पोलिसांना स्वखर्चाने उपचार घ्यावे लागत असणे तसेच सेवा निवृत्तीनंतर पोलिसांना वैद्यकीय आणि आरोग्य सुविधा मिळत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ च्या अंतिम सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईसह राज्यातील पोलिसांना हक्काचे घर आणि सेवानिवृत्तीनंतर वैद्यकीय सेवा सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२०-१२-२०२१) :** (१) व (२) I. महाराष्ट्र राज्यातील पोलीसांना व त्यांच्या कुटुंबियांना खाजगी रुग्णालयात नि:शुल्क उपचार मिळाण्यासाठी शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक ०२/१२/२००५ व दिनांक २८/०७/२००६ अन्वये पोलीसांकरीता महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत बृहन्मुंबईतील ३३ व राज्यातील १९४ खाजगी मल्टीस्पेशालीटी असलेल्या रुग्णालयांना पॅनलवर घेण्यात आले असून उक्त योजनेतील तरतुदीनुसार २८ आकस्मिक व ११ गंभीर आजारांवर नि:शुल्क उपचार केले जातात.

II. सध्या महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचा लाभ केवळ पोलीस दलात कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी/ कर्माचारी व त्यांच्या कुटुंबियांना अनुज्ञेय आहे. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/कर्मचारी या योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही.

III. राज्यातील पोलीस दलातील कर्मचारी यांना घर बांधणीसाठी बँकामार्फत कर्जाची व्यवस्था करण्यासाठी शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक १०/०४/२०१७ अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे.

IV. मुंबई पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या सेवा कालावधीमध्ये शासकीय सेवा निवासस्थाने वाटप करण्यात येतात. तसेच पोलीस कर्मचाऱ्यांकरीता मालकीतत्वावर सेवा निवासस्थाने वाटप करण्यात येत नाही.

V. पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उप निरीक्षक दर्जापर्यंतच्या सेवा निवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या कार्यवाहीधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई